# महाराष्ट्र शासन


## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,

पत्रव्यवहाराचा पत्ता: ७ वा मजला, जी.टी. रूग्णालय प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ००१

दुरध्वनी क्रं. ०२२ २२६२७९४२, फॅक्स क्रं. ०२२ २२६२२०८४

संकेतस्थळ : www.mahawsad.gov.in. Email- WSSD_DO9_RPOLICY@maharashtra.gov.in. wssdpapu७@rediffmail.com


**क्र. ग्रापाधो-१११३/प्र.क्र.३२/पापु-७** **दि. १९ मार्च,२०१३**

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

**विषय : ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी विहीत करण्यात आलेली हागणदारी मुक्तीच्या अटीबाबत..**

संदर्भ : १) शा. नि.पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दि. १७ मार्च,२०१०.
२) शा. शुद्धीपत्रक पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दि. ३० ऑगस्ट,२०१०
३) शा. नि.पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१५४/पापु-७, दि. १४ सप्टेंबर,२०१२
४) शा. परिपत्रक.पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६०/पापु-७, दि. ०४ ऑक्टोंबर,२०१२
५) शा. परिपत्रक.पा.पु.व स्व.वि. क्र. ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१६०/पापु-७, दि. १५ जानेवारी,२०१२

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये, मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरित करण्यासाठी संबंधित गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट विहीत केलेली आहे.

२. बीड व उस्मानाबाद जिल्ह्यात निर्माण झालेली टंचाईसदृश्य परिस्थिती विचारात घेता, उपरोक्त हागणदारी मुक्तीच्या अटीमुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीमधील अडथळे दूर व्हावेत यासाठी संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये त्या जिल्ह्याकरिता व संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकान्वये, राज्यातील निर्मल भारत अभियानाच्या जिल्हा कृती आराखडाबाह्य गावांसाठी सदर अट दि. ३१ मार्च,२०१३ पर्यंत शिथील करण्यात आली आहे.

३. तसेच, राज्यात अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेता, संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकान्वये, राज्यातील निर्मल भारत अभियानाच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्यातील ५० वा त्यापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या टंचाईग्रस्त गावांच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनांसाठी प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारीमुक्त व प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा व तिसरा हप्ता वितरित करण्यासाठी विहीत केलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीचा अट दि. ३० जून,२०१३ पर्यंत शिथील करण्यात आलेली आहे.

४. संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरित करण्यापुर्वी संबंधित गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट विहीत करण्यात आलेली आहे. तथापि, सदर अट संदर्भ क्र.३ चा शासन निर्णय व संदर्भ क्र. ४ व ५च्या शासन परिपत्रकान्वये शिथील करण्यात आली आहे. तिसरा हप्त्याचा निधी वितरित करण्यासाठी हागणदारी मुक्तीची अट विहीत करण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भ क्र. २ च्या शासन शुद्धीपत्रकानुसार शासन अनुदानाच्या पहिल्या दोन्ही हप्त्यांच्या निधीचा १०० टक्के विनियोग झाला असल्यास ,संबंधित गाव १०० टक्के हागणदारी मुक्त आहे किंवा कसे ही बाब विचारात न घेता योजनेचा तिसरा हप्ता वितरित करावा.

(र. अं. खडसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२) पापु-७ संग्रहासाठी